तात्काळ

UDSTAT /ICD/2011-12/33

मुंबई- ४00 0३२.

मे, २0 १२

प्रति,

प्राचार्य,

ठाणे जिल्हयातील सर्व महाविद्यालये,

विषय :-सन २0११-१२ या शैक्षणिक वर्षातील माहिती पाठविणेबाबत.

महोदय,

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन हे प्रकाशन ठाणे जिल्हयाचा जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा तयार करतांना तसेच सदर प्रकाशनामधील माहिती शासनाला नियोजनाकरीता उपयोग करण्यासाठी विहीत वेळेत प्रकाशित करण्यासाठी जिल्हा सांख्यिकी अधिकारी ठाणे यांनी क्र. जिसांका/ठा/जिसाआस/२०१२/१६२, दिनांक ०५ मे २0१२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सदर पत्राच्या अनुषगांने सन २0११-१२ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी संख्येबाबतची माहिती आपल्या महाविद्यालयाकडून सोबत असलेल्या विहित माहितीच्या तक्त्यात (८.४, ८.५,८.६, ८.१३, ८.१४) मध्ये तातडीने भरुन, सन २0१0 -११ च्या माहितीच्या तुलनेत २0११-१२च्या माहितीमधील ज्या-ज्या बाबीमध्ये लक्षणीय वाढ/घट किंवा त्रुटी/विसंगती असतील त्याबाबतची कारणे तसेच आवश्यक ते स्पष्टीकरण माहितीच्या सोबत देण्यात यावे माहितीमधील वाढ/घटीची कारणे स्वतंत्र टिपणी स्वरुपात देण्यात यावी तसेच स्वच्छतागृहाबाबतची (शौचालय)माहिती देखील देण्यात यावी व त्याची एक प्रत जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, बर्वे इमारत, २ रा मजला, गोखले रोड, नौपाडा, जि. ठाणे - ४००६०२. येथे हे पत्र प्राप्त झाल्यापासून सात दिवसात पाठविण्याची व्यवस्था करावी.

तसेच आपणास कळविण्यात येते की सदर विहित तक्त्यांचे नमुने विद्यापीठाच्या वेब साईटवर **http://www.mu.ac.in/stats** उपलब्ध असून तेथून Download करुन **Supt.statunit@gmail.com** या ई मेल वर देखील पाठविण्याची व्यवस्था करावी हि विनंती.

आपला विश्वासू

सही/-

उपकुलसचिव,

(सांख्यिकी विभाग)